# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१६/०६/२०१६.

**१) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :—**

अ) दिनांक १५/०६/०१६ रोजी १९.३० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ७३१८ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत भिलेवाडा येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. दुर्गे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

ब) दिनांक १५/०६/०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी ३३४३ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूच्या नशेत भिलेवाडा येथे चालवितांना मिळुन आला. त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आले. असे सर तर्फे फिर्यादि पोहवा. बडवाईक वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. भुरले पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) मुलाचा मृत्यु. :—**

दिनांक १४/०६/०१६ रोजी १५.०० वा. ते दि. १५/०६/०१६ रोजी ०८.०० वा. पर्यंत दिवाकर बकाराम सोनवाने वय २५ वर्ष, रा. पाऊनगाव हा गावातील स्वतःच्या मालकीच्या शेळया चारण्यासाठी गावालगत असलेल्या मरू नदिच्या काठाकडे गेला होता. १८.३० वा. पर्यन्त शेळया व दिवाकर सोनवाने गावात परत आला नाही म्हणुन त्याला पाहण्यास फिर्यादी नरेश शंकर कुरूडकर वय ३१ वर्ष, रा. पाऊनगाव हे गावातील लोकांसोबत गेले तर नदीच्या पलीकडील काठावर शेळया बसलेल्या दिसल्या व दिवाकरची पिशवी गावाकडील काठावर दिसली पण तो दिसुन आला नाही. म्हणुन दि. १५/०६/२०१६ रोजी सकाळी ०८.३० वा. ढिवर लोकांनी डोंग्याच्या मदतीने मरू नदीच्या खोल पाण्यात काटेरी तारेने त्याचा शोध घेतला तर त्याचे प्रेत काटेरी तारेला अडकून मिळुन आले. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोना. चांदेवार पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) वाघाने हल्या केल्याने इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १५/०६/०१६ रोजी ०७.३० ते ०८.०० वा. दरम्यान रूपचंद मन्साराम माटे वय ४७ वर्ष, रा. परसोडी हा जंगल लगत असलेल्या शेतात शौचास गेला होता. वाघाने त्याच्यावर हमला करून त्याला जिवानीशी ठार मारले. असे फिर्यादी राजेंद्र हिरामण माटे वय ४२ वर्ष, रा. परसोडी

यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी पोउपनि. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) ईलेक्ट्रिक शॉक लागल्याने मृत्यु. :–**

दिनांक १५/०६/०१६ रोजी ०१.३५ वा. दरम्यान विजय रमन सानी वय १६ वर्ष, रा. अंबिका मेटल भंडारा याला कुलरचा इलेक्ट्रीक शॉक लागल्यामुळे त्याला बेहोश अवस्थेत उपचारा करीता सा. रू. भंडारा येथे आणले होते. परंतु त्याला डॉ. ने तपासुन मृत घोषीत केले. डॉ .मेमो वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. चौकशी सफौ. कन्हाके पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.